International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly

ISSN – 2347-7075
Impact Factor – 6.457
Vol.6 No.6 July–Aug 2019

# ग्रामीण समाजातील कला: एक दृष्टीक्षेप

**प्रा. शरद नामदेव बोरवडेकर**
*सहायक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग,*
*गोपालकृष्ण गोखले महाविदयालय, कोल्हापूर*

**प्रस्तावना :**

२१ व्या शतकातील देशाचा विकास विज्ञान व प्रगत तंत्रज्ञानावर आधारित आहे, असे असले तरी विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या उदयच मानवी विचारशक्तीतून झाला आहे. मानवाने या विचारसरणीला कलेची जोड देऊन वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये आपल्या विकास घडवून आणला. या कलाकुसरीचे मुळ मात्र ग्रामीण संस्कृती आहे. मानवी संस्कृती ही प्राचीन असून अगदी सुरवातीपासून तिचे स्वरूप 'ग्रामीण संस्कृती' असेच होते. विविध प्रकारच्या कला मानव निसर्गाकडून शिकला. पक्ष्यांचे आवाज, त्यांची घरटी वांधण्याची पद्धत, आकाशात उडण्याची किमया, प्राण्यांची लकव इत्यादी गोष्टीच्या निरीक्षणांतून मानवाने कला आत्मसात केल्या. सर्व प्राणी सृष्टीत मानव हा बुद्धीमान प्राणी असल्याने स्वतःच्या बुद्धीने त्याने 'कला विकास' घडवून आणला.

पाश्चिमात्य समाजशास्त्रीय विचारवंत रॉबर्ट रेडफील्ड, ए. एल. कोबर यांनी मानवी समाजाचे तीन खंडात (Part of Societies) विभाजन केले. त्यात नागरी समाज (Urban Society), कृषक समाज (Peasant Society) व जनजातीय समाज (Tribal Society) असे मानवी समाजाचे केलेले विभाजन अन्य कोणत्याही देशाला पुरेपूर्ण लागू होत नसले तरी भारतीय समाजास ते नक्की लागू होते. या विवेचनात त्यांनी एक मत मांडले ते म्हणजे, नागरी ममाज आणि जनजातीय समाजापेक्षा कृषक समाज हा अतिप्राचीन, स्वंयपूर्ण, समरूप (Hamogenous), अस्तरिकृत आणि स्वंय नियंत्रण

कर्ता असा आहे; आणि अमे असण्याचे कारण म्हणजे, 'शेती हा प्रमुख व्यवसाय व यातून विकसित केलेली कलाकुसर म्हणून भारतीय समाजव्यवस्थेत ग्रामीण कलेला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

प्रस्तुत लेख हा दुय्यम साधनसामग्रीवर आधारित आहे. ग्रामीण कलांची वैशिष्ट्ये, त्यांच्या परिचय समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून करणे हे प्रस्तुत लेखाचे प्रमुख उद्दिष्ट्ये आहे. पस्तुत लेखाची विभागणी दोन गटात केली आहे. पहिल्या विभागात ग्रामीण समाजातील प्रमुख कलांचा परिचय करण्यात आला आहे. तर दुसऱ्या विभागात ग्रामीण कलांची प्रमुख वैशिष्ट्ये विषद केली आहेत.

**ग्रामीण कलांचा परिचय :**

प्रस्तुत विभागात ग्रामीण समाजामध्ये आढळणाऱ्या कलांचा परिचय; खालीलप्रमाणे...

**अ. शिल्पकला :**

ग्रामीण कलेच्या प्रकारामध्ये शिल्प कलेच्या अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. अजंठा, वेरूळ, घारापुरी, कार्ले, भोजे, औरंगाबाद, अनकाई, पांडवलेणी, चांभारलेणी इत्यादी विविध प्राचिन मंदिरे यावरून ग्रामीण लोकांना उत्कृष्ट शिल्पकला अवगत होती असे दिसून येते. प्राचीन काळातील देव-देवता, त्यांची स्मृतीचिन्हे, युद्ध कलेचे प्रसंग, लोकजीवन, समाजरचना, राज्यव्यवस्था, धार्मिक कार्यक्रम इत्यादी घटनांची शिल्पकला ही एक सांस्कृतिक जोपासणा होती. आजही अश्मयुगात वावरणाऱ्या पाथरवटांची संस्कृती आपल्याला त्यांची साक्ष देते. हिंदू संस्कृतीने या कलेचा विकास केला असे आपणास म्हणता येईल पण त्याचवरोबर इतर धर्मीयांनी देखील ही कला जोपासली आहे त्यामध्ये बौद्ध आणि जैन धर्माचा येथे दाखला देणे महत्त्वाचे आहे. अफगाणिस्तानमधील नुकत्याच तालिबान्यांनी फोडलेल्या उंच बुद्धमूर्ती त्यांची साक्ष देतात. श्रवणबेळगोळची महाविरांची हा ही एक दाखला म्हणता येईल. इंडोनेशियात देखील भारतीयांची ही कला विविध मंदिरांच्याद्वारे पसरलेली दिसून येते. अशाच कलेतून स्थापत्यकलेचा जन्म झाला आहे.

**ब. चित्रकला :**

शिल्पकला आणि चित्रकला यांचा जवळच संबंध आहे. येथे असे म्हणणे योग्य वाटते की, चित्रकलेचा जन्म शिल्पकलेपासून झाला. चित्रकलेमध्ये सुक्ष्म लोकजीवन आणि घटना रेखाटण्याचा प्रयत्न कलाकारांनी केल्या. निसर्गात आढळणाऱ्या विविध अविष्कारांची रेखाचित्र आजही ग्रामीण संस्कृतित पहावयास मिळतात. त्रिकोन, वर्तुळ, चौकोन अशा भौमितीय आकारांचा वापर करून तयार केलेली चित्रकला आजही हे प्राचीनत्व किंवा ग्राम्य टिकवून आहेत. i.e. वारली चित्र हा एक संस्कृतिक ठेवा आहे, तसेच अजंठा लेण्यातील रंगीत चित्र. ही चित्रे विविध वनस्पती व खनिजांपासून रंग तयार करून ती काढली असून वर्षानुवर्षे टिकून आहेत. म्हणजे रंगसंगतीचाही आविष्कार चित्रकलेच्या जोडीला पहायला मिळतो. अशाच रंगांचा वापर करून व पुरातन काळातील प्राणी, पक्षी, राज-राजवटीची प्रतिके व प्रसिद्धी पावलेल्या घटनांच्या आधारावर लोकांनी गोंदणकला अस्तित्वात आणली. त्याकाळी स्त्री व पुरूषांच्या शरीरावर (कातडीवर), वनस्पतींचा प्राण्यांच्या हाडा; माशाच्या धार-धार काट्यापासून चित्र कायमचे गोंदविले जात. आधुनिक काळात अशा कलेला व्यावसायिक स्वरूप प्राप्त झालेले पहावयास मिळते .

**क. विणकाम व कशिदाकारी (भरतकाम) :**

अश्मयुगातील मानव प्राण्यांच्या कातडीपासून शरीराचे रक्षण करत होतो. नैसर्गिक ऋतूपासून रक्षण करण्यासाठी प्राण्याची कातडी शाश्वत साधन नसल्याने दुसऱ्या साधनाचा शोध चालू ठेवला. त्या नंतरच्या काळात मानव वनस्पतीची पाने वस्त्र म्हणून परिधान करू लागला (आज ही काही आदिवासी जमाती वनस्पतीची पाने व वेलीचा वस्त्र म्हणून वापर करतात). जेव्हा मानव स्थायी स्वरूपाचे जीवन जगू लागला, शेती कसू लागला तेव्हा स्त्रीयांनी विणकामाची कला विकसीत केली. पाण्याचे केस, वेली याच्यां साधन म्हणून वापर करून लागले. विविध प्रकारची वस्त्रे प्रथम ग्रामीण भागातच तयार झाली. या काळात कापूस आणि सूई याद्वारे विणकाम केले जाऊ लागले. त्यांच्यावर रंगीत कापूस धाग्यांनी विणण्याची कला किंवा कशिदाकारी कला अस्तित्वात आली. गालिचे तयार

करणे, पैठणी सारखी उंची वस्त्रनक्षी या सर्व कला मूळच्या ग्रामीण लोकजीवनातील आहेत. काश्मीर गालिचांसाठी तर पैठण व येवला पैठणीसाठी प्रसिद्ध आहेत.

**ड. संगीत कला :**

आज शहरी जीवनाशी अधिक जवळीक साधणारी व विकसित झालेली ही कला असली तरी तिच्या पाया ग्रामीण संस्कृतीत आढळतो. ग्रामीण संगीतात भावने बरोबरच मनोरंजनाला अधिक महत्त्व दिले आहे. संगीत कला ही नृत्य, गीत व वाद्य या त्रयींनी बनलेले आहे. जात्यावरची गाणी, अंगाई, विवाहाप्रसंगी म्हटली जाणारी गाणी, हादगा किंवा भोंडल्याची गाणी (भुलाबाई) यांचा उगम ग्रामीण संस्कृतीतच आहे. वासुदेव, पोतराज, गोंधळी यांची गाणी, भारूडे इत्यादी गीत वा काव्यप्रकार भक्तिरसनिर्मिती करतात, तर शाहिरी पोवाड्यांतून वीररसाची निर्मिती होते.

वस्तुनिष्ठ काव्यात जानपद किंवा ग्रामीण काव्याचा समावेश होतो. ग्राम्य जीवनशैलीची पार्श्वभूमी त्यात असते. शेतकरी, नावाडी, कामकरी इत्यादींचे जीवन त्यातून दिसून येते. ग्रामीण भावनाविष्कार अधिक उघड असतात. नागरी जीवनात सामाजिक बंधने मर्यादा आणतत, येथे भावना सूचकतेने व्यक्त होतात, पण ग्रामीण संस्कृतीत वास्तव उघडपणे मांडले जाते. त्याचा प्रत्यय शृंगाररस निर्मिती करणाऱ्या लावणी नृत्यात पाहायला मिळतो. अर्थात काही लावण्या अध्यात्मक संकेत देणाऱ्याही असतात. ग्रामीण नृत्य प्रकारात (प्रस्थापित खेड्यातील) 'काव्य, नाट्य, नृत्य' असा एकत्रित संगम असतो; त्यास तमाशा किंवा नवटंकी असे म्हणतात. आज 'लोकनाट्य' या शीर्षकाखाली तो ओळखला जातो कष्टमय जीवनात ग्रामीण लोकांना यातील कथानक, विनोद व अदाकारी आणि संगीतामध्ये विरंगुळा मिळतो .

वरील गीत वा नृत्य प्रकारांना साथ मिळते ती लयकारी सांभाळणारी वाद्ये वाजविल्याने. ही वाद्ये तयार करणे व ती वाजविणे ही एक कला आहे. या विविध वाद्यांचे मुळही ग्रामीण संस्कृतीत आढळते. यांची अनेक उदाहरणे देता येतील कृष्णाची बासरी आणि पिंपळाच्या पानाची पिपानी ही ठळक उदाहरणे आहेत. एकतारी, सारंगी, तुणतुणे, परधान, थोटी (गोंड-बुरूड) यांचे किगरीवाद्य,

भजनातील टाळ किंवा झांज, थाळीवाद्य, प्राण्यांच्या कातड्यापासून तयार केलेले ढोल, ढोलकी, ताशा, संवळ, टिमकी, खंजिरी, कहाली, नगारा, तूर, नंदीबैलवाल्या जवळचा गूबगूब वाजणार ढोलक; रानभोपळ्यापासून तयार झालेली पूंगी, जनावरांच्या शिंगापासून केलेली वाद्ये व अगदी समुदातला शंख ही सर्व ग्रामीण संस्कृतीतील मूळची वाद्ये आहेत. अशा नृत्य, गीत व वाद्य मेळामुळे ग्रामीण संगीत आपले वेगळेपण टिकवून आहे.

**इ. हस्तकला :**

हस्तकलेचा अर्थ आहे, निसर्गाने दिलेल्या वस्तूवर किंवा पदार्थावर संस्कार करून सौंदर्यपूर्ण वस्तू तयार करणे होय. जसे बांबूपासून टोपल्या, करंड्या, पडदे तयार करणे, वाळयाचे पडदे, चटया, पत्रावळी, हस्तीदंतापासून विविध वस्तू, लाकडावरचे कोरीव काम, शिंपल्यापासून शोभेच्या वस्तू, नारळाच्या झाडाच्या विविध भागापासून उपयुक्त वस्तू यांची निर्मिती यांत येते. कुंभाराची मूर्ती तयार करण्याची कला, चांभाराची चपला शिवण्याची कला, सुताराची शेतीची अवजारे तयार करण्याची कला इत्यादी कला मुळच्या ग्रामीणच आहेत. शिंगे व बांबूपासून कंगवे बनविणे हे एक उदाहरण आहे. दोर तयार करणे हे हस्तकलेचाच नमुना होय.

**ग्रामीण कलेची वैशिष्ट्ये :**

प्रस्तुत विभागात ग्रामीण समाजात आढळणारी ग्रामीण कलेची सर्वसाधारण वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे...

**१. दैनंदिन जीवनाशी एकरूपता :**

ग्रामीण कला दैनंदिन जीवनाशी एकरूप आहे. गामीण समाजातील मुल्ये, रूढी, परंपरा, नियमने व लोकाचार यांचे सम्यक दर्शन ग्रामीण कलेत दिसून येते. ग्रामीण कला व्यक्तीच्या संपूर्ण जीवनाशी एकरूप झालेली होती. समाजातील जाती व्यवस्था, धर्म, जादू तसेच इतर तत्वज्ञान हे कलेत एकरूप झाल्याचे दिसून येते.

**२. ग्रामीण कलेचे केंद्र कुटुंब :**

'कुटुंब' ही एक सार्वत्रिक संस्था आहे. त्यामुळे ग्रामीण कलेत त्यांचा प्रभाव अनन्यसाधारण आहे. सदस्यांच्या जीवनाशी व भविष्यात उपयुक्त कला सदस्याला आत्मसात करण्यासाठी कुटुंबातील आई-वडील, आजी-आजोबा, इतर नातेवाईक यांचे नातेवाईक यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. व्यक्ती ज्या कुटुंबात जन्माला आली ते कुटुंब कोणत्या जातीचे आहे, त्या कुटूंबाचा परपंरागत व्यवसाय कोणता आहे यावरून त्याने कोणत्या कला आत्मसात कराव्यात हे ठरते. भारतीय समाजामध्ये बलुतेदारी व अलुतेदारी पध्दती नुसार त्या त्या कुटुंबातील सदस्याना त्यांच्या कला आत्मसात करण्यामध्ये कुटुंब महत्वाची भूमिका पार पाडते. थोडक्यात कुटुंबातील व्यक्तींना अवगत असणारी कला त्या कुटुंबातील बालक आत्मसात करण्याची शक्यता जास्त असते म्हणून ग्रामीण कलेचा केंद्रबिंदू कुटुंब आहे.

**३. ग्रामीण कलेचे स्वरूप सामुदायीक असते :**

ग्रामीण कला ही सामुदायीक स्वरूपाची आहे. समाजातील लोक कलेमध्ये सामुदायीक सहभागी होतात. यामध्ये वृध्द, प्रौढ, तरूण-तरूणी, लहान मुले-मुली त्यांच्या वयानुमार कलेच्या निर्मितीसाठी व विशिष्ट कला आत्मसात करण्यासाठी प्रयल करत असतात. त्यामध्ये युद्धकला, शिल्पकला, चित्रकला, विणकाम, भरतकाम, हस्तकला, संगीतकला, विविध प्रकारचे खेळ व धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम यांचा समावेश होतो. या कला व्यक्तिगत स्वरूपाच्या नाहीत. तर त्या संपूर्ण समाजाच्या आहेत. अनेक पिढ्यानपिढ्यातील कलाकाराकडून ग्रामीण समाजात विविध कलांची निर्मिती ही सामुदायिक पद्धतीने झाली. त्यामुळे या ग्रामीण कलेचा नेमका जनक कोण हे सांगणे कठीण आहे. म्हणून सामुदायीकता हे एक ग्रामीण कलेने महत्त्वाचे वैशिष्ट्ये आहे.

**४. साधे तंत्रज्ञान :**

ग्रामीण कलेसाठी लागणारी साधने ही निसर्गातून प्रत्यक्ष उपलब्ध होणाऱ्या विविध स्त्रोतातून तयार केली जातात. त्यामुळे त्या साधनाच्या निर्मितीसाठी कारखानदारी पद्धतीची किंवा आर्थिक

बाजूची जास्त गरज भासत नव्हती. शिल्प तयार करण्यासाठी, कोरण्यासाठी लागणारे दगड, चित्र रंगवीण्यासाठी लागणारे रंग हा वनस्पतीची फुले, पाने यांच्या पासून मिळत होता. बांबू पासून टोपल्या तयार करताना यात फक्त हस्तकलेची गरज भासत होती. थोडक्यात ग्रामीण कलेसाठी लागणारे तंत्रज्ञान हे साधे होते.

**५. शेतीशी निगडीत कला :**

कला आणि शेती यांचा तसा जवळचा संबंध आहे. त्यामुळे त्यांच्या कलेतून आपणास शेती व्यवसायासंबंधी अनेक लोकगीते पहावयास मिळतात. शेतीमधील विविध कामे जमिनीची नांगरट, वियाण्यांची पेरणी, पिकांची कापणी व मळणी या घटना त्यांच्या लोकगीतातून प्रकट होतात. शेती हा व्यवसाय प्रत्यक्ष निसर्गावर अवलंबून असल्याने निसर्गाच्या कोप टाळण्यासाठी व निसर्ग देवतेला प्रसन्न करून घेण्यासाठी अनेक स्वरूपाच्या कला ग्रामीण समाजात उदयास आल्या. शेती व्यवसाया बरोबरच पशुपालन, मेंढी-शेळीपालन या जोडव्यवसायाशी संबंधीत गीते, धनगरी ओव्या, धनगरी वाद्य, मेंढ्याच्या लोकरीपासून सुत विकण्याची कला अशा कलाकुसरीना वाव मिळाला.

शेतीसाठी लागणारी अवजारे तयार करण्याची जवाबदारी बलुतेदारी व अलुतेदारी पद्धतीतील लोकांची होती. त्यामुळे अवजारे तयार करण्यासाठी लागणारे विशिष्ट कौशल्य या लोकांकडे होते.

**६. व्यावसायिक स्वरूपाचा अभाव :**

समाजातील व्यक्तीच्या गरजा (मनोरंजन, ज्ञान) भागवण्याबरोबरच समाजव्यवस्था एकजूट ठेवणे हा ग्रामीण कलेचा मुख्य हेतू होता. त्यामुळे कलेला व्यावसायिक स्वरूप प्राप्त झाले नाही ग्रामीण कलेला सामाजिक भावनेची जोड होती. कलेची निर्मिती किंवा उदय व्यक्तीगत होत असली तरी ती कला व्यक्तीगत राहत नव्हती. तिची निर्मिती ही सामुदायिक असते. त्याच बरोबर यातून जे कलाकार तयार होतात ते समाजातील सर्व स्तरातील लोकांच्या निखळ आनंदासाठी आणि केवळ कलात्मक उद्देशाने आपल्या कलेचा अविष्कार घडवून आणतात. ते याकडे आर्थिक फायदा किंवा

व्यवसायाच्या दृष्टीकोणातून पाहात नाहीत. कलाकार हे ग्रामीण समाजातील लोकांच्यासाठी कला जतन करीत असतात. म्हणून ग्रामीण कलेला व्यावसायिक स्वरूप प्राप्त झाले नाही.

**७. पिढयानपिढया कलात्मक कसब संक्रमण :**

समाजातील सर्वच व्यक्तींना कला अवगत असते असे नाही तर ती कला समाजातील विशिष्ट व्यक्तीकडे असते. पण त्या कलेची उपयुक्तता समाजातील सर्वच व्यक्तींना असते अशा वेळी समाजात कलात्मक कसब आणि संस्कृती यांचे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमण होत असे. यास कारण म्हणजे त्यावेळी मुद्रण, दृक्-श्राव्य माध्यमे उपलब्ध नव्हती. त्यामुळे कलाविषयक ज्ञान हे वडीलधारी मंडळी मुलांकडे किंवा एखादा कलाकार त्यांच्या शिष्यांकडे संक्रमित करीत असतो. आजसुद्धा गोंधळी लोक त्यांची गाणी, कला ह्या परंपरेने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित करताना दिसतात. याच कारणांनी खेड्यातील सर्वसामान्यांना काही कथा परिचित असलेल्या आढळतात.

**समारोप :**

समाजाच्या विकासामध्ये कलांची महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. त्याचबरोबर समाज एकजूट व एकसंध्य ठेवण्यासाठी सुद्धा ग्रामीण कला महत्त्वाच्या आहेत. या कला समाजव्यवस्था टिकवून ठेवण्याबरोबरच ग्रामीण लोकांना ताण-तणाव यातून मुक्ती देऊन मनोरंजन सुद्धा घडवून आणतात ज्यामुळे समाजव्यवस्थेचा समतोल राखला जातो. आधुनिक युगात मात्र विज्ञान आणि प्रगत तंत्रज्ञानामुळे ग्रामीण कला लोप पावण्याच्या मार्गावर आहेत असे दिसून येते. या कला संस्कृतीच्या संरक्षण व संवर्धनासाठी लोकांमधून व स्वयंसेवी संस्था, शासन दरबारी आत्मीयता असल्याचे आज तरी प्रकर्षाने जाणवत नाही हीच शोकांतिका ग्रामीण कलेची आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची:**

1. चौधरी, नारायण आणि आपटे, अविनाश (२००३): 'ग्रामीण राजकारण व संस्कृती', यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
2. चुनखडे, ना.ए. आणि पाटील, वि.भ. (१९९०) 'ग्रामीण समाजशास्त्र', फडके प्रकाशन, कोल्हापूर.
3. नाडगोंडे, गुरूनाथ (२००२) : 'ग्रामीण समाजशास्त्र', कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे.
4. पगार, स.नि. (१९९२) : 'खानदेशातील ग्रामदैवते आणि लोकगीते', का.स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था, धुळे.
5. भोसले, कुन्दा (१९९८) : 'साहित्यशलाका', शब्दश्री टाईप सर्व्हिसेस, नाशिक - १
6. बाबर, सरोजिनी (१९९७) : 'दसरा-दिवाळी', महाराष्ट्र लोकसाहित्यमाला पुष्प-२८.
7. दांडेकर, व्ही. एम. आणि जगताप, एम.वी. (१९९०) : 'महाराष्ट्राची ग्रामीण समाजरचना', पुणे.